# पद्मभूषण वसंतदादा पाटील

सांगली क्रांतीभूमी म्हणूनही ओळखली जाते. पत्रीसरकार, बिळाशीचे बंड या धाडसी चळवळी सांगली जिल्हयातूनच झाल्या. पद्माळ या छोटया गावात शेतकरी कुटूंबात पद्मभूषण वसंतदादा पाटील यांचा जन्म झाला. क्रांतिकारी मातीतल्या या रोपाचा वट वृक्ष कृष्णेपासून ते यमुनेपर्यंत पसरत जाऊन राष्ट्रभर पोहोचला होता.

स्वातंत्र्य पूर्व काळात 'ग्रामसुधारणा मंडळ' या नावाचे एक मंडळ पद्माळे गावात सुरु झाले. यामध्ये बलोपासना, सामाजिक विधायक कार्यासाठी करावी असे सुत्र् होते. पावसाळयात कृष्णामाई रुद्रावतार धारण करायची. तेव्हा लोकांच्या सोयीसाठी गावक-यांच्या मदतीने आणि श्रमदानातून संबंध गावक-यांच्या मदतीने गावासाठी पक्का कृष्णा घाटच बांधून काढला. आणि पोरकट वयातही एकीचे बळ दाखवून दिले.

सामुहिक इच्छाशक्तीची ताकद विधायक कार्यात कशी वापरावी याचा एक आदर्शवस्तुपाठ शिल्पांकित केला.

सन 1930 मध्ये स्वातंत्र्य पूर्व काळात सोलापूर ताडीच्या सत्याग्रहाचे वेळी राष्ट्रीय असंतोषाने तरुण वर्ग पेटला होता. तरुणांनी हिप्परगी तलावापाशी असलेले ताडीच्या झाडांचे जंगलच तोडण्याचा घाट घातला. ब्रिटीशांनी पोलीस यांनी दंडशक्ती वापरुन आंदोलन मोडून काढायचा घाट घातला.जमाव खवळला जमावावर पोलीसांनी बेछूट गोळीबार केला. जमावाने पोलीस स्टेशनलाच आग लावली. यामुळे सरकार अस्वस्थ झाले. सत्याग्रहींवर खटले भरले गेले. त्यातील काहींना लष्करी कोर्टाने आरोप ठेऊन फाशीची शिक्षा दिली. या घटनेचा दादांच्या तरुण मनावर खोल परिणाम झाला. आणि त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी पेटलेल्या सशस्त्र क्रांतीकार्यात स्वतःला झोकून दिले.

15 ऑगष्ट 1947 च्या मध्यरात्री स्वातंत्र्य मिळाले होते त्या रात्री सांगली परिसरात धो धो पाऊस झाला. त्या रात्री दादांच्या मनातील क्रांतिकारकाने मनोनिग्रह केला. आणि आपली बंदूक पिस्तुल, काडतुसे, हिंसग वस्तू कृष्णेच्या पुरात फेकून दिल्या. आणि ''तिरंग्यापुढे कधीही हाती शस्त्र न धरण्याची तसेच देश हेच कुटूंब मानून, देहात प्राण असेपर्यंत सार्वजनिक हितास्तव सर्व ते काम करीन'' अशी शपथ घेतली. त्यांचे जगणे म्हणजे एक उघडा ग्रंथ होता.

वसंतदादांची वाणी अत्यंत गोड होती. आणि चेहरा प्रसन्न, त्यांच्या व्यक्तीमत्वात एक आदरयुक्त भीती होती.